

# उदाळी

राजा महाजन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १४८५
२१२ १९६०
REFBK-0011256
REFBK-0011256

अनुक्रम २८७४
विभाग वाङ्मय
सांकेतांक ?
नों. दि. २०/१२/६०

# डहाळी

REFBK-0011256
REFBK-0011256

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११२५६

# डहाळी

[ काव्यसंग्रह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... विः ....................
क्रमांक .................... नोंः दिः ....................

राजा महाजन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ११२५६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मूल्य रु. २·००

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली
ऑक्टोबर १९६०

*  *

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

*  *

चित्रकार
अनंत सालकर

*  *

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन,
४१० शनिवार पेठ : पुणें २.

*  *

मुद्रक :
चिं. ग. वझे
साधना प्रेस,
४३०/३१ शनिवार पेठ : पुणें २.

*प्रिय प्रा. म. ना. अदवंत*

*आणि*

*प्रिय सौ. लीलाताई अदवंत*

यांस —

— राजा

## निवेदन—

हा माझा पहिला काव्यसंग्रह. गेल्या दहा वर्षांत वेळोवेळी लिहिलेल्या कवितांपैकी कांही निवडक कविता या संग्रहांत समाविष्ट केलेल्या आहेत. यांतील पुष्कळ कविता ' महाराष्ट्र साहित्य पत्रिका ', ' छंद ', ' मराठवाडा ', ' सुदर्शन ',' प्रतिष्ठान ' इत्यादि नियतकालिकांतून यापूर्वीं प्रसिद्ध झाल्या आहेत.

आजच्या या नवकवितेच्या युगांत माझ्या कवितेचें स्थान कुठे आहे याची माझी मलाच कल्पना नाही. कविता लिहिणें हा माझा छंद आहे— माझ्या जीवनांतील तो आनंद आहे. त्याचें मूल्यमापन करण्याचें काम रसिकांचें आहे. त्यांच्या पसंतीला या कविता उतराव्यात हीच इच्छा.

माझ्या काव्यरचनेचें ज्यांनी ज्यांनी कौतुक केलें व मला मार्गदर्शन केलें त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें मी माझें कर्तव्य समजतों. सुरुवातीपासूनच माझे आईवडील, प्रा. अदवंत, प्रा. तारळेकर यांनी मला उत्तेजन दिलें व मला योग्य तें मार्गदर्शन केलें. माझे मेहुणे श्री. शंकरराव माळी, माझे मित्र श्री. दत्ता पाटील व आत्माराम चौधरी यांनी माझें कौतुक केलें. या सर्वांना माझ्याविषयी किती जिव्हाळा वाटतो याची मला कल्पना आहे. त्यांचे आभार मानलेले त्यांना आवडणार नाही. तरीहि काव्यक्षेत्रांत संग्रहरूपाने प्रथम पदार्पण करतांना कृतज्ञता बुद्धीने यांचा उल्लेख करणें अवश्य आहे असें मला वाटतें.

त्याचप्रमाणे ज्या नियतकालिकांनी माझ्या कवितांना प्रसिद्धि दिली त्यांच्या संपादकांचाहि मी फार आभारी आहे. ‘ व्हीनस ’ चे–श्री. पाध्ये यांनी संग्रह–प्रकाशनाची ही जबाबदारी स्वीकारली म्हणून त्यांचे व आकर्षक मुखपृष्ठ काढून दिलें याबद्दल चित्रकार सालकर यांचेंहि मी आभार मानतों.

शेवटीं ज्ञानेश्वरांच्या शब्दांत एकच विनवणी करावयाची आहे—

**तऱ्हीं न्यून तें पुरतें । अधिक ही सरतें**
**करुनि घेयावें हें तुमतें । विनविलें मियां**

जळगांव, पू. खा.
१९-१०-६०.

— राजा महाजन

# डहाळी

थंडींत गुलाबी झडलीं सारीं पानें
हरएक डहाळी गाते उदास गाणें
चाहूल चावरी येतां जों चैत्राची
डोळ्यांत डहाळी पाही तांबुस स्वप्नें !

* * *

# गोरी

‘ गोरी ! तुझं गोरेपण
तुला चांदण्याचं ऊन ’
बिसतंतूंचे नूपुर
जड झालं ग चालणं

वस्त्र विजेरी तलम
वायुलहरींचा शेला
स्वप्नशृंगार डोळ्यांत
खेळे पापण्यांचा झूला !

मृदू जलाहून ओठ
कंठ पळसाचें देठ
तुला चालतां लागेल
थांब ! झुळकीची ठेंच.

* * *

# तुझें येणें ......... तुझें जाणें

तुझें येणें
जीव घेणें

तुझा स्पर्श
स्वप्नदंश

तुझी साथ
धुंद रात

तुझें गीत
मुक्त रीत

तुझा ताल
व्यथाजाल

तुझी रीत
जग–वित

तुझें जाणें
पंखडणें

ग्रंथ संग्रहालय
११२५६

* * *

# अर्धिंच रात !

अर्धिंच रात
रुपेरी बात
मादकतेची मधु बरसात !

अर्धिंच कोर
नाजुक पोर
नभीं जागते अजुनि छिचोर !

अर्धिंच गाणीं
रंगति रानीं
घुमे प्रतिध्वनि कळीकळींतुनी !

अर्धिंच जाग
उरांत आग
शांतविण्या कुणि गाई राग !

अर्धिंच तारा
पहाट वारा
सौंदर्याचा अविट फवारा !

अर्धिंच स्वप्नें
दिव्य तराणे
मुखीं घोळतां उमजे जगणें !

* * *

## पहाट बघते

पहाट बघते डोळे उघडुन
अर्धोन्मीलित कमलामधुनी
रत्नदीप तर अजुनि न विझले
भोवतालच्या नगरामधुनी !

उगाच का मग दंवबिंदूंनी
कोण गुदगुल्या करतो तनुला
भारलि काया रोमांचांनी
हसतो वायू राईमधला !

पहाट बघते डोळे उघडुन
कांबळ अपुली सारित दूर,
ऐकूं येती देवळांतले
मंगल भैरविचे मधु सूर.

अंग झाडुनी द्विरेफ उठती
वृक्षावरती होई फडफड,
रात्रींच्या परि स्वप्नीं अजुनी
तनू कुणाची पेंगुळते जड !

पहाट बघते डोळे उघडुन
मावळतीला चंद्र उठवितो
परि रमणीया, सुस्नाता ती-
पूर्वा बघतां मनांत झुरतो !

उरीं उमाळा, तोंड आपुलें-
मावळतीच्या कुशीं लपवुनी,
विरहाचा दिन कंठण्या जणूं
वेड्यापरि भटकतो नभांतुनी

पहाट बघते डोळे उघडुन
होय निशेची आकृति धूसर
अन् पूर्वेच्या गर्भामधुनी
चैतन्याचा फुटतो अंकुर !

* * *

# जीवन - साहित्य

जसें झोंबतें बाळ स्तनाशीं
स्पर्शुन जातो पहाटवारा
पेंगुळलेल्या नयनीं अधिकच
शिरते निज सोडीत किनारा

ढगाळलेल्या क्षितिजावरुनी
सूर्य सरकतो वेधित वाट
उषा खिन्नशी होउनि बसते
उगीच पाहत धुकाळ थाट

वातावरणीं अवाचित घुमते
मोटकऱ्याची लयमय साद
राईमधुनी कुहूकुहूचे
कानीं शिरती अन् पडसाद

आंब्याखाली वेचित कैऱ्या
कृषिबाला ही फिरे कोणशी
धूसर वस्त्रीं खुलते काया
बोंडांतुन जणुं फुटे कपाशी

बुंध्याजवळीं बाप बैसला
दोन चिरगुटें अवतीं भवतीं
धुरांतुनी चिलमीच्या पाही
क्षण सौख्याची रंगसंगती.

दो दगडांवर मडकें बसलें
शुष्क काटक्या जळती खाली
सकाळचा तो डोस उकळतो
उसळत येई गुळाचि लाली

शोधित कैऱ्या इकडे तिकडे
जाइल विकण्या मग गावांत
दो पैशांच्या बाजारांतुन
आणिल जीवनाचें साहित्य

* * *

# हिरवी वेदना

दुपार वाटे व्हावी राका
रखरख वाटे व्हावी हिरवळ
चुकार ढग तो व्हावा तारा
'पडेल' वायू व्हावा अवखळ

मलुल सलिल तें लाटा होउन
सुस्त किनारे व्हावे चंचल
ती चंचलता भरून व्हावें—
लोभस अवकाशाचें अंचल !

सूर्य जरासा व्हावा शीतल
किरणांनी व्हाव्यात गुदगुल्या
बघतां बघतां क्षणांत विजनीं
रंभा नाचाव्या मनांतल्या

त्या नृत्यांचीं व्हावीं लेणीं
आमा जीवनीं विस्फारित नव
'असल्या' हुन हें 'नसलें' व्हावें
अनुभूतीला आणित शैशव

दुपार जळकी चुकार ढग तो
रखरख हसते कुत्सित मैना
आणि मनांतिल तशिच राहते
हिरवि वेदना ! हिरवि वेदना !

* * *

# जरा व्हावें

जरा व्हावें बेगुमान
द्यावी तुफानाला साद
आणि थंडी वाऱ्यांतिल
जरा लुटावा उन्माद !

झाडून टाकावी सारी
प्रतिष्ठेची मर्त्य कात
निसर्गाचा प्यावा वारा
अनंगाशीं झोके घेत

सागराशीं घ्यावी झुंज
मेरूला हाणावा टोला
झोका नभाला बांधून
घ्यावा तिन्ही लोकीं झोला !

कल्पनेच्या बावळ्यांत
ओतूनिया जीवप्राण
जरा मारावा फटका
अतीताच्या राज्यांतून

चांदण्यांचे हिरे पाचू
सारे टाकावे फोडून
आणि बघावा तयांत
' राम ' आहे का अजून ?

क्षितीजाच्या कूहरांत
जरा घालूनिया हात
दिव्य आत्मे आणूनिया
जरा मांडावा उत्पात

संस्कृतीचीं बारवें हीं
द्यावीं उधळून पार
पृथ्वी सारी घूसळावी
नवा निर्माया ॐकार !

* * *



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

## भल्या पहाटें—

भल्या पहाटें
निघे गवळण
दह्या-दुधाचा घट घेऊन
कोसावरच्या खेड्यावरून
पांढ टाकीत चालते रेलून
पडतात मागे—
तरूच्या छाया, शेतांतल्या उभ्या गर्द आंबराया,
शुभ्र कातळांची मधु झुळझूळ,
नभीं नक्षत्रांची गूढ चुळबूळ,
आणि पिकांतली काळी सळसळ,
खोपट्यामधली उष्ण फडफड,
बांधावरचे घंटानिनाद,
घरट्यामधले कुहुकुहू साद.
पावलागणीक सडक पडते मागे,
उठती तरंग
मनांत स्वप्नांचे मनोरथांचे—

"येणाऱ्या पैशाच्या पायघडीवर
आणीन सुखाची, शांतीची दौलत घरास माझ्या,
भाकर भाजीची गोड न्याहारी
पोराबाळांच्या ओठांत घालीन
येणाऱ्या सणाला आंगडें करीन."

सडकेप्रमाणे स्वप्नहि थांबतें
आणि जवळ येतें शहर—

गिरणीचा भोंगा, यंत्राचे नाद
टांग्यांचीं चक्रें, दुचाक्या जोरांत
खडखड, धडधड, जीवन-आस्वाद !

रात्रपाळीने पेंगुळलेला टांगेवाला येतो टांगा घेऊन
'नेहरु टी हाऊस' बघून थांबतो ;
एका कपाची चाय घोटून
घोड्याला शिळी थाप मारतो ;
विडी चेटते मुखांत बेचव
जसें ओल्या सरणीं पेटतें शव !

पेपरवाला पोऱ्या ओरडतो —
फेप्रेस एम्प्रेस ! गाडीला अपघात
खुनाची धमकी, दरोडे अटक, जारीने तपास
संपाच्या वावड्या, नर्गिसचें लग्न,
कवींचा चंद्र ख्रुश्चेव्हच्या खिशांत
ताज्या बातम्या रहस्यपूर्ण
महायुद्धाचा जणुं ज्योतिषी
काखेंत पुडकें
मुखाचा लाउडस्पीकर चालतो मशीनगन !

धावत सुटतो दिवसपाळीचा
रात्रभर कोणी तळमळणारा
कुडाच्या पडक्या झोपडींतला गिरणदास
जातां जातां आणि पुसतो शेजारीं
हळूच 'कोणता आला रे नंबर ?'
गेलेल्या नाण्याला आणण्यासाठी
परत लावतो नवीन आकडा
जसा धर्मांचा पूर्वीं झाला होता महारवाडा !
कवि म्हणतो, 'बिचारा मजूर'
मजूर रडतो, 'अरेरे नंबर !'

पांढऱ्या इस्रीच्या आकृत्या उठती
लगबगीने आणि गाठती
सलून, हॉटेल्स, स्टेशन, गिरण्या, ऑफिस तैसें
महांकाळाचीं हीं निवासस्थानें
वाटेला लागती भक्तिभावाने.

येते गवळण सांगितल्या घरीं
'दही घ्या! दूध घ्या!' हाकारा घालीत
लागेल तेवढें मापावें द्यावें
बांधावें आणें-नाणें कडोसरीला;

"कां ग दही कां आंबट चिळ्याचें
माजले तुम्ही लोक हवीच शिक्षा तुम्हांला!"
असले आहेर तेथेच सोडून, निघे गवळण;
पुन्हा चघळीत मनोरथांच्या आंबट गोळ्या
कडोसरीचे पैसे मोजीत
आलेल्या पैशांचा होतो जमाखर्च
आवक-जावक मेळ बसेना
जीवन-घराची भिंत उठे ना!
'उद्या' चा हवाला देऊन 'आज'
चुकवितो मान कशीतरी ती!

मनोरथाचे रूळ लांबतात.
दोन पैशाची चाय घेऊन
दोन पैशाची साखर होते
उरलेल्या नाण्यांची तेल-डाळ होते
असला बाजार बांधून डोईला
रिकामा घट तो परते खेड्याला!

* * *

# चांदरात

पुनवेची चांदरात
जसें नितळ कातळ
माशापरी तारकांची
चाले गूढशी मांदळ

हवेंतला गारवा जो
जातो काया चुंबुनिया
लाख धबधबे उरीं
उसळती गर्जुनिया

शीत शांत अवकाश
वाट पहूडली जरा
अवखळ झुळुकीने
तिचा चेततो नखरा !

शांत झाडें, शांत पिकें
शांत वहाते सरिता
उष्ण-शीत वाळूंतला
स्पर्श घालतो विळखा

मुरलीच्या सुरांतुनी
घाली कुणी आर्त साद
मिळेल का कधी त्याला
तेच आर्त पडसाद ?

पुनवेची चांदरात
कुणा प्रीतिस्पर्श देई
कुणा विरहाचा शूल
कुणा नवी नवलाई !

पुनवेची चांदरात
अशी भावुक भावूक
उरांतल्या भावनांचे
वितळती हिमसेक !

* * *

# भुलावण

थडथड नाचुन गेल्या धारा
क्षणभर गेला वारा खिदळुन
नभांतल्या त्या काजळि लेण्या
भूवर आल्या क्षणांत वितळुन

या थट्टेने चिडली धरणी
भामा बसली जशी रुसूनी
कृष्ण-गढुळ-नितळशा जलाचा
सरिता-शेला पडला गळुनी

स्फुंदुं लागलीं पर्णें तेव्हा
डबक्यामधलें रूप न्याहळित
धुरकटलेल्या पाण्यामध्ये
पक्षी बसले पंख पाखडित

आल्या धारा, गेल्या धारा
क्षणांत रस्त्यावर हो पाणी
निवळुन गेलें नभ हें पुरतें
खळखळल्या अन् लहरी पुलिनीं

भिजल्या वाटा, भिजलें रान,
दिशाहि भिजल्या, भिजलें जीवन
भिजल्या वातावरणीं सुटला
उग्र-शीतसा सौरभ तरळुन !

रस्त्यावरचें पाणी उडवित
गवतावरचे बिंदू झाडित
पाय वळावे असेच पुढती
अंतरांतल्या तारा छेडित !

* * *

# मधल्या रात्रीं

अशाच एका मधल्या रात्रीं
अवचित आली जाग जराशी

तेवत होती
मिण मिण ज्योति
गौतम बुद्धाच्या स्थितप्रज्ञशा
मुखासारखी

तिची काजळी
तिलाच होती उजळीत जणूं
संकटांतल्या संताप्रमाणे

अवतीं भवतीं
होता भरला निःशब्दांचा अन्
भारावलेला गूढ एकांत

भिंतीवरतीं
चित्र गांधींचें
तेच हसरे दोन नयन
स्रवत सारखे
मानवतेची अखंड गंगा !

जरा बाजूला
कुरुक्षेत्रावर पार्थ हरीचा
जीवनदायी गीतांमृताचा
रंगीत साज, युगायुगांचा
चेतनस्रोत

आणि तिकडे
गोरी राधिका काळा मोहन
निळ्या यमुनेच्या काठावरतीं
कदंबाखाली
करताहेत जीवनरसाचें आकंठपान !

अशींच आणि
कितीक चित्रें
पहात होतों एकटकांत
तृषार्त झालेल्या तान्ह्यासारखा
तरीहि नव्हती तृप्ति वाटत.

अशाच एका मधल्या रात्रीं
अवचित येते जाग जराशी
अंतरांतल्या उजळून वृत्ती
होते जीवाला
भक्ति-शांति नि प्रीतीची कधी
सश्रद्ध आणि समर्थ जाणीव !

* * *

## नितळ नभाची

नितळ नभाची ओंजळी भरून
तारकाफुलांनी
चालत आली मंथर शर्वरी
पांढरा गुलाब चंद्राचा हुंगीत
भारून टाकीत अवघें जीवन !
वारुणी स्रवते तिच्या ओठांतून
गळला विश्वाचा क्षुद्र अहंकार
विरल धुक्याच्या जलाशयांत
झालें बेभान कुशींत शिरून

बाभुळवनांत
हिरव्या क्षणांत
काजळी पाण्यांत
मौनाच्या गाण्यांत !

शीतल वारा चुंबी किनारा
अंगीं प्रत्यंगीं उठे शहारा
नेत्रांत नाचतें तेजाळ नर्तन
शोधीत आकाशीं गळले पैंजण !

बहरल्या वृत्ती उचंबळे चित्तीं
स्मृतीच्या शुक्तींत प्रीतीचे मोती
त्याच मोत्यांची गुंफूनी माळ
माझ्याच मस्तींत मोजतों दाणे
गात जीवनाचें शाहिरी गाणें !

* * *

# भोवरी

आज सखि गेली तिच्या सौभाग्याच्या नव्या घरीं
रिकामें हें मन माझें घेई उगीच भोवरी
पाचोळ्यापरी हें कसें वाटे हलकें हलकें
उन्हापरी विरहाचे कसे बसती चटके
सासरची वाट सखि! तुझी हिरवी हिरवी
मनीं बोलली असेल, ‘ नवरी चालली नवी!’
गेला बाळपणा गोड फुगड्या, भांडणें, खोड्या
क्षणीं चिंचेसाठी येती फिरुनी बोलघेवड्या
पिवळ्या हळदीचा ग साज पिवळा चढतां
गोरीच्या गोरेपणाला चंद्र लाजला पुरता
हिरव्या चुड्यांनी तुझ्या भरे संगीत घरांत
दिवाळीचें देवपण सदा नांदेल घरांत
माझें एकटेपण हें चार दिवस बोचेल
तुझ्या आठवणी येतां नेत्रीं कातळ जमेल
तुझ्या सुखी संसाराला नको माझी लागो दृष्ट
नको थट्टेंतहि म्हणूं सखि तुझी होती खाष्ट!
तुझा माझा सखिपणा जसं पाटाचं ग पाणी
दोन भाबड्या जिवांची त्यांत भिजली कहाणी
कधी मधी आली तुला जरा माझी गोड सय
आठव ग भाव माझे नको अवखळ वय!
सखि, सखि म्हणून मी ओठ भिजविते माझे
विरहाच्या काट्यांतले फणसाचे गर ताजे
पिंपळाच्या पारावर एकटी बसून झोकीं
वेड्यापरी गाईन मी तुझ्यावाचून पोरकी
आईबहीणीचा लळा माया तूं ग केली थोर
भरलेल्या आभाळांत आता एकटीच कोर

* * *

# तुला पाहतां

तुला पाहतां बिथरे वारा
पदराशीं करि चाळा वीज
खोल तुझ्या नयनांत नभाळ्या
चंद्र साजरी करतो बीज !

भूलीलांचीं फूलपाखरें
रंग उधळिती नेत्रामधले
नयनकडांच्या क्षितिजावरती
लाजवंतिचे गेंद बहरले !

मिस्किलतेची छटेल मैना
कपोलांतल्या खळींत दडते
दोन बटांच्या हिंदोळ्यावर
झुलतां, फुलतां, खुलते, डुलते !

कुरळकुंतलीं दडलेल्या त्या
कर्णफुलांचे तिरकस डोळे
गालावरची कांति लालसर
बघतां बघतां झाले वेडे !

* * *

## झंकार

फुल फुलें रानांतलें रानांताचि फुलायाचें
उगीच कां जखडतां बंध तया जडतेचे ?

प्यावा पिसाट मरुत ल्यावी प्रकाशाची झूल
डुले खुल्या अंधारांत काजव्याचा पर्णी झूल !

पहाटेच्या फांदीवर बसे पाखरूं उन्हाचें
करी त्याशीं स्वप्रसाद रानफुल अंतरींचें !

ओसंडती वर्षा घ्यावी उभी उभी अंगावर
आणि वसंतीं चुंबावें सौंदर्याचें दहीवर !

शिशिराची गोड धुंदी जागवित चघळावें—
स्वप्न, असें जगण्याचें कांही आगळें जगावें !

रानांतल्या विराणीचा जरा भरावा झंकार
कांही आसक्ति विरक्ति-युक्त मांडावा संसार !

फुलवीत कळी कळी उफाळीत भावगंध
निळ्या निळ्या नभासंगें सदा गुंफी भावबंध

फुल फुलें रानांतलें रानांताचि फुलायाचें
सौंदर्याचि प्राण ज्याचा न हो निर्माल्य तयाचें !

* * *

## असें छळावें

धार विजेची परजे गगनीं
तसें छळावें वाटे तुजला
वादळ वाऱ्याच्या झुंजीने
छेडावें अन् मार्गीं तुजला

किरणामधला प्राशुन ताप
दाह जरासा द्यावा तुजला
तुफानांतल्या वावटळीने
उधळावें तव शृंगाराला

शीत जलाची सुरी रुपेरी
होउन, तुजला जखम करावी
अन् सलणाऱ्या तुझ्या व्यथेवर
दाहक फुंकर मग मारावी

असें छळावें, तसें सलावें
छंद मनाचे येतों योजुन
बघतां बघतां नकळत जाते
पायतळींची वाळू सरकुन ।

* * *

## ३:शाप

एकांताची काळी कांबळ
ऊष्ण उसासे सोडी आंतुन
दूर सभोवर माळ पसरला
भकासतेला अधिकच जखडुन

खिडकीमधले चौकोनी नभ
मनांत शिरले चोरपावलीं
बघतां बघतां क्षणांत येते
भरुन गर्दशी स्मृतीसाउली

गर्दी होते जलदांची अन्
जशा आठवणि गत काळाच्या
वाऱ्याची हो सुरू धावपळ
टिपऱ्या बडवित तरुवेलींच्या

आभाळापरि मनही भरतें
वीज चमकते तव नयनांतिल
रंग बदलुनी ढंग माजतो
इतरांना जणुं ठेवित गाफिल

तुझ्या बटापरि सुटती धारा
तनूस माझ्या भिजवित, सुखवित
ओलेत्याने भटकत फिरतों
तुला जागवित मलाहि जगवित !

* * *

## उगीच

उगीच केलें प्रेम वाटतें
तुझ्यासारख्या चंचलतेवर
उगीच जुळवित बसलों ओळी
नीरस अर्थाच्या गुंथेवर !

मिळालि नाहिस तूंही आणिक
अर्धीमुर्धी इथे आठवण
घटका झाल्या त्याहि क्षणांच्या
सोबत माझें मला रितेपण !

विरल्या मध्यान्हीला जेव्हा
ऊन धरेला सांगे गूज
राखी पारवा त्या गूजाचा
ढवळुन जातो माझी नीज.

लोचट लहरी पिंपळपानीं
बसती गिरवित कूजनसंथा
डहूळलेल्या मनांत माझ्या
भावगुणांची सुटते गुंथा !

* * *

# तूंच म्हणावें

तूंच म्हणावें—

‘ थांब जरा ना
बैस जरा ना ’
नेत्रामधल्या दंवाबिंदूंनी
आर्जवपानीं यावी आर्द्रता
आठवणींचीं थरथरणारीं पानीं फुलावीं
कांही डसावीं दुखणाऱ्या त्या सुखासारखीं;

तूंच पुसावें

कुशल कांहीसें चिंबट शब्दीं
संध्यासमयीं रेंगळणाऱ्या उन्हासारखें,

तूंच हसावें

मज हसवावें
उगीचतेच्या इंद्रधनुष्यीं
खुलणाऱ्या त्या सुरंगापरी

तूंच करावें

कांही बोलणें
खुजे उखाणे
कांही क्षणांची विस्कटलेली
व्हावी गुंफण अर्धीमुर्धी
कुठे स्थिरावा त्यांत जरासा
हूं हूं चा ढळता पारा

आणि शेवटीं

‘ बरें येतों मी
येत जा कधी ’
वाटेवरती यावें नकळत
स्पंदनांतलें चघळीत दुःख
प्रकाशांतला जपत काजवा !

* * *

# शीण

ढळते जेव्हा रात काजळी
कणा ठणकतो आकाशाचा
पापणींतली सुस्त बाहुली
चाळा करिते कांहि क्षणांचा

आणि वाटतें, ‘ नको जागृती
चिरनिद्रेला अंत नसावा
या जगण्याचा भातकुलीला
तुझ्या भक्तिचा खाउ असावा ’

ढळते जेव्हा रान काजळी
फिक्कट क्षणांची जमते वीण
आणि प्रकाशीं नुसता भरतो
अणुरेणूंतुन संज्ञाशीण !

* * *

# मनांतला ' मी '

मनांतला ' मी ' नसतो जेव्हा ठिकाणावर,
मला वाटतें,

" परोपकाराच्या क्रूसावरती
घ्यावें स्वतःला ठोकून, लोंबकळत,
सत्त्व-सौजन्याच्या जोडगोळीने ह्या—
उरांत घ्यावें आनंदे भेदून,
सात्त्विक कृतींची गाथा अशीच
द्यावी फेकून सारी जनाच्या या इंद्रायणींत,
स्वतःची जीवन-जानकी द्यावी
त्यागून, धाडून रानावनांत
सेवेच्या चिपळ्या, भूतदयेचें भस्म लेपून
परमार्थाची वीणा छेडीत,
मानवतेच्या मंदिरांत
जावें गुंगून, व्हावें तुकाराम;
लोकनिंदेचे प्रहार झेलावे हासत, आघात
ज्ञानेशासारखे;

ज्ञानेश – तुकोबा
ख्रिस्त – गांधीजी
यांची मिळून मूस करावी,
तयांत स्वतःला घ्यावें मिळवून ! "

पण—

मनांतला ' मी ' होतो जेव्हा जागा,
तेव्हा वाटतें,

" माझ्यापरी भोगी
असावा मीच ! "

* * *

## हिरवी भिंत

गर्द हिरवी ही भिंत
वीजदिव्याशीं बोलेना
‘ संग तुझा माझा थोडा
याने जीव हा भरेना ’

गर्द हिरवी ही भिंत
रंग निरखिते दाट
अंधाराच्या कनातींत
भरे पाकळ्यांचा हाट

गर्द हिरवी ही भिंद
हिला खिडक्यांचे बंध
अडे गजांचें चांदणें
वारा पंख्याखाली धुंद

गर्द हिरवी ही भिंत
अशी डोळ्यांत मावेना
हिच्या रंगाच्या वेडांत
दार उघडें राहीना !

* * *

# ध्यास

निळ्या नभाच्या छायेला
ऊन बसे बिलगून
भर दुपारीं किनारा
जळ चाटतो लाखून

मंदिराच्या गाभाऱ्यांत
थंडाईला सुटे झोप
लिंबाखाली वाटुलीला
गुदगुल्या करी रोप

हेवा सुटतो आंब्याला
गाभारींच्या थंडाईचा
डोळे मिटून खडक
ध्यास घेतो कळसाचा

कृतकर्मांच्या ओझ्याने ( स्मृतीने )
हेलावला जीर्ण वड
अश्रुसरींची लागली
पारंब्यांत एक झड

वेस सुस्तावली जरा
वस्त्र तृणाचें ओढून
झुळुकीला राहवेना
पाही हळूच ताणून

* * *

## नकोस राहूं

नकोस राहूं इतुकी भोळी
खुळेपणाचें चघळित बोर
हवें कशाला असलें वेड
ठकवित तारुण्याचा चोर !

नजरेमधले चंचल भाव
शुकापरी बंदिस्त असे कां ?
वाटा चुकवित अवखळतेच्या
शमेल उरींचें परी पिसें कां ?

अधिऱ्या ओठा मुडपित जाशी
जाळिंत मौनाच्या बळजबरी
किती ठेवशिल लाज उरातिल
पदराआडच अन् बेखबरी !

मुग्धपणाचा फसवा डोळा
उगीचतेची मिटे पापणी
शालिनतेचा ढळता शेला
झाकूं पाहे धुंद चांदणी !

* * *


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि: ........

# चांदण्यांत उभी तूं !

चांदण्यांत उभी तूं नार गडे निळवंती
नभ तुला बघाया उतरे क्षितिजावरती !
हा निळा गारवा झोंबे किति अंगास
अन् शुभ्र चांदवा खुलवी नील छतास

ही हिरवळ, छे, छे नील सरोवर भरलें
तूं नीलकमलपरि त्यांत गौरवें डोले
नजरेंत निळ्या तरलोर्मी हेलाविती
अन् निळ्या शालुंतुन खुले शुभ्रशी कांती !

पसरला चहुकडे निळा सुगंधि बहार
तूं निळ्या स्वप्नपरि करिसी त्यांत विहार
लाजवी पिका तव निळ्या चुडयांचा साज
चुंबितां फुला तूं निथळे निळसर लाज !

तूं विहर विहर मन्मनीं मासळीवाणी
घट भरुनि क्षणांचे थयथयते स्मृति-पाणी
या निवातिल घटिका नुरेल चित्रहि ऐसें
सौंदर्य स्मृताचें मनांत भरविल पिसें !

* * *

## धीट असावी—

धीट असावी नजर तुझी अन्
मार्गहि माझा नीट नसावा
अवचित व्हावी गाठभेट अन्
वळणावरती दिवस थिजावा.

लंघुन जावे पापण्यांतले
धीटपणाचे उंच अडोसे
उरांतल्या त्या भावक्षितिजीं
अन् निरखावे गूढ भरोसे

उसळुन यावें गंधित स्पंदन
त्वक्स्पर्शाचा बहार चाखित
स्मृतिघटिकांच्या तुझ्या गोपिका
वेड्या व्हाव्या नंदन शोधित.

तुझ्या स्मृतीचा गोड गारवा
शिंपित जावा स्वाप्निल अंतर
वेडिं पाउलें पुढे वळावीं
ठिबकत ठिबकत जखमी अंतर !

धीट असावी नजर तुझी अन्
मार्गहि माझा नीट नसावा
औचित्याच्या पाणवठ्यावर
अनुभूतीचा घडा टिचावा !

* * *

## येईन म्हणतें—

येईन म्हणतें तुझिया दारीं
नितळ जलाचें लेवून वस्त्र
अन् वीजेची कंचुकी कसवून
नेत्रीं रेखून कृष्णनभाचें
स्वप्निल काजळ,

भांग भरोनी अरुणाने तो
माळीन वरती इंद्रधनुष्य
रुळवित सारा कचपाशाचा
विळखा सैल
शिंपून त्यावर कौमुदीचुरा
अन् काजव्यांचीं कर्णकुंडलें
करीन कांही असें प्रसाधन

येईन म्हणतें
तुझिया दारीं
अंधाराची घुमवित शीळ
येईन म्हणतें अशाच वेळीं
भेट घ्यावया तुझी आगळी !

* * *

## आहे रात्र तुझी माझी

आहे रात्र तुझी माझी
दिवसाचें कोण जाणें !
चांदण्याच्या पावसांत
आता कशाला उखाणे ?

झिंगले ग सारे क्षण
नेत्रीं नकोच काजळ
प्रकाशाच्या पावलांनी
येतें लाजेचें मोहळ !

विभ्रमांची काय कथा
मौनीं भिजला शृंगार
सार्द्र अवकाशांतून
तनु चुंबिते अंगार

आहे रात्र तुझी माझी
दिवसाचें कोण जाणें ?
पापपुण्याचे हवाले
आज होतील शहाणे !

* * *

## माझें दुःख

माझें दुःख सागराचें
चंद्रासाठी झुरणारें
दुःख माझें अंधाराचें
तेजासाठी संपणारें

माझें दुःख धरणीचें
सूर्यासाठी जळणारें
दुःख माझें तृणाचें नि
रुक्षतेंत हसणारें

माझें दुःख आकाशाचें
पृथ्वीसाठी स्रवणारें
दुःख माझें तारकांचें
अतीताला भेदणारें

माझें दुःख काजळ्यांचें
अंधारांत कुढणारें
दुःख माझें समईचें
भक्तीसाठी जळणारें

माझें दुःख बालकाचें
मातृरक्त शोषणारें
दुःख माझें क्रुसाचेंच
रक्तासाठी पिचणारें

माझें दुःख माणसाचें
जगावया झुंजणारें
माझें दुःख असें आहे
दुःखांतहि सुखणारें

माझें दुःख, माझें दुःख,
माझ्या दुःखा नांव नाही,
नांव आहे, गांव नाही
गांव आहे ठाव नाही!

माझ्या दुःखा कळ आहे,
बळ आहे, वळ आहे,
माझ्या दुःखा दुःखाचाच
एक असा चळ आहे!

* * *

## चित्र

चिमणीच्या प्रकाशांत
काळ्या पेंगुळल्या भिंती
कोपऱ्यांत उतरंड
रित्या पोटीं करी भक्ती.

दार झोकांड्या खाऊन
चाळवितें थंड चूल
येते कुडाच्या कानांना
रोज मृत्यूची चाहूल

कुंती झोपली भुईशीं
पांच पांडव पोटाशीं
भिंतीवर कृष्णचित्र
गीता सांगे मच्छरासी

* * *

## चैत्र उन्हांत—

म्हणे मोहरला आंबा
रसरसली डहाळी
बुंध्याच्याहि गालांवर
आली तांबुस नव्हाळी.

चैत्रउन्हांत फुटला
काळ्या कंठांतून सूर
पाहतांना वाटसरू
होई आचंब्यांत चूर.

* * *

## मिरीएवढ्या मनांत—

तुझ्या अस्तित्वाचा स्पर्श
त्याला बाधेची काजळी
झाली ओळखीची आता
अर्ध्या अंधाराची कळी

डोळ्यांतला एक सल
सल आभाळाएवढा
मिरीएवढ्या मनांत
एक सागरी आवंढा !

* * *

## क्षितिजाच्या आडोशाला

सांजावल्या दिवसाला
आली काजळी उदासी
वाटुलीला सोसवेना
जड पावलांच्या दुशी

करपली धुळवड
पानापानांत शिरली
आणि माळाच्या मनांत
लांब साउली जिरली

वळणाच्या पाठंगुळीं
खोड बाभळाचें उभें
काळ्या मातींत कर्दळी
ओलाविते मनसुबे

संथ पाण्यांत पेंगुळे
नाव किनारा खेटून
क्षितिजाच्या आडोशाळा
ढग निघाला भिजून

* * *

## असोशी

चांदवेडें स्वप्न माझें
मला ओढी चांदण्यांत
चातकाच्या असोशीने
मन धावे अस्मानांत

नभ निळें, शीत स्पर्श
नवथर लहरींचा
रोमांचित तनु प्राशी
गंध ओला चांदणीचा !

पडणाऱ्या पाउलांत
स्पंदनाची ओढ दाटे
वाटेवर वळणाशीं
प्राजक्ताची रास भेटे !

होऊनिया मुक्त असे
असूपशा भावबळी
आवेगाच्या उधाणांत
पालवते गीतकळी

स्वप्नवेडें मन माझें
मला ओढी चांदण्यांत
जगण्याला अर्थ येई
अनुभूतीच्या गर्भात

* * *

# भेट

नजरेच्या विळख्यांत
लाजावेस पुन्हा पुन्हा
स्पर्शघटाच्या काठाला
डोह जाणवावा उणा

नाखुषीच्या पारावर
व्हावी तुझी माझी भेट
आणि टचकन् टिचावी
गोऱ्या तळव्यांत वीट !

* * *

## छडा

शब्द होता अनोळखी
अर्थ होता पाहुणासा
दिठीमिठींत स्पर्शाचा
दंश केला भर दिसा !

अर्थ अडला गर्भात
शब्द झाला शब्दवेडा
अवेळींच्या माडवाशीं
लोक लावतात छडा

झालें आकाश अंगण
उभी क्षितिजाच्या दारीं
उरांतल्या आठवांना
कशी सांगूं, ' मी कुमारी ! '

* * *

## वेणावल्या जगण्यांत

उसळत्या उरांतील
कसा टिपूं शब्द शब्द ?
अंधाराच्या ओठांतला
कसा रेखूं भावबंध ?

खुणावत्या निळाईला
कसा देऊं पडसाद
आणि पेटत्या वाऱ्याचा
कसा सांभाळूं उन्माद !

स्वर कळींतला घाली
आर्त आवेगी उखाणा
अडलेल्या शब्दांतून
छंद रुतला दिवाणा !

झालों मला ' मी ' पारखा
वेणावल्या जगण्यांत
आशयाच्या सागराला
पडे टिटवीचा धाक !

* * *

# सारं जग झोपल्यावर

सारं जग झोपल्यावर
तूं म्हणतेस, "ऊठ जरा

चल जाऊं दोघं
दूर त्या तिथं
अंधारबनांत;

मीरेचं वीष तुला देणार नाही,
ख्रिस्ताचा क्रूस तुला ठोकणार नाही
तुझी छाती मला माहित आहे

डोळे मिटून दूध पिणाऱ्या
मांजरासारखी."

पाऊलवाट येते चालत माझ्या पायाशीं
गती साकारते तुझ्या शब्दांतून
अंधारबनाच्या मार्गावर उभ्या
तमसावल्यांच्या तरल अप्सरा
प्रकाशाचे डोळे झाकीत केसांनी
रात्रराधेच्या ओठांतली आर्त
विराणी ऐकवतेस तूं.

अरूपतेचा विशाल माळ
कालियासारखा डोलत असतो

भोवळबाधा अशरिरिणी अस्तित्वाला छेदित जाते
जेव्हा तूं अन् मी
अंधारबनांत
सारं जग झोपल्यावर

* * *

## पिंजरा

रेशिमशा बंधनाचा
तेव्हा रुचला पिंजरा
नवलाईने झुलतां
हर्ष झाला दिलवरा !

येतां सोबतीण मैना
पिंजऱ्याच्या पाळण्यांत
वाटे उडत्या दिठीला
सुखस्वप्नांची खैरात

" चोच चोचींत घालून
दाणे टिपीत प्रीतीचे "
वेड्या राघूला वाटलें
हेंच जगणें जिवाचें

विसरला निळें नभ
आणि अस्मानीं भरारी
शुभ्र कातळांचें वेड
कच्च्या पेरूंची खुमारी !

विसरला दरींतला
ओला सौरभ फळांचा
झाड–पर्वतांचे शेंडे
स्पर्श नाचऱ्या वेलींचा

विसरला सारें सारें
मुक्त जीवनाचें गीत
स्वप्नांतल्या साउलीला
बसला कुरवाळीत

आली कळून जगाची
कटू व्यवहारी रीत
स्वप्नदग्ध दिठींतून
गळे आसवांची टिप

पिंजऱ्याच्या आडोशाला
स्वर आठवतो जुने
वाटींतल्या पाण्याने अन्
पाही भिजवूं जगणें

* * *

## उत्तर

उसावल्या धरणीला
हासे सघन आभाळ
" तुझी भेगाळली तनु
माझा चिरेबंदी फाळ;

माझ्या चंद्रतारा लाख
कल्पस्रोत सौंदर्याचे
क्षितिजाचे कटिबंध
तुला नाही सोसायचे ! "

बोले धरणी हसून
" पुरुषाला काय कळे,
माझ्या दुःखाला फुटती
गोड अमृताचे कळे ! "

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ११२५६

## थांब उद्याच्या मानवा !

आज अण्वाची भरारी
देई अंतराळा छेद
आणि यंत्राच्या मिठींत
गळे अर्जुनाचा स्वेद

विज्ञानाच्या वाटेवर
जीवनाला लागे धाप
आठवतां जळे आत्मा
कुण्या अभाग्यांचे शाप

ऐट दाखवी माणूस
विकासाच्या लक्तरांत
पैशापैशाच्या छायेला
पुरविती भले हेत

घोटाळते मानवता
थडग्याच्या आसपास
पापपुण्याचें पुराण
वाणी बांधतो पुज्यास

संशयाच्या टाचेखाली
संचिताचे घातपात
आस्तिक्याच्या नांवावर
वाढे सैतानाची जात

इतिहासा अर्थ येथे
आम्ही देऊं तैसा मिळे
अशुभाच्या पैंजणाला
धर्म मिचकावी डोळे

तुझ्या कर्तृत्वाचे लेख
पहा वळूनिया मागे
थांब उद्याच्या मानवा !
पाय उचलतां वेगे !

* * *

# कलत्या दुपारीं

कलत्या दुपारीं
नीरमयीच्या शुभ्र प्रवाहीं
गिर्रेबाज कबुतर एक
शीत जलाशीं करतें चाळा
पीत रुपेरी किरणें चहाटळ
चुगली सांगती झुळुकीपाशीं
बघून त्याची सावळी छबी
दूरवरचा थोराड डोह
मिटून डोळे खडकाचे आणि
करतो आहे ध्यान बकाचें
सोडीत सुस्काऱ्याचे तरंग
शेलाटी लव्हाळी
उगीच करते
त्याचा मत्सर
दोन किनारे
भिडून पाण्याला
तसेच राहाती कोरडे अभुक्त
आसावलेले
कबुतराची सजल फडफड
मत्स्यगंधेचें केशरी हास्य
छेडीत जाते
सरितेच्या अंगीं
वेदनाझंकार
उडतें कबुतर पिंपळाकडे
कापीत जाते त्याची भरारी
अवकाशाचें हळवें ऊर
आणि जखमेला सुगंध सुटतो
" कांहीतरी "च्या धुंद फुलाचा !

* * *

## तुझ्या वादळविड्याने—

माझं लहानसं घर
तुझी गगनभोंवरी
माझा थेंबथेंबासिंधु
तुझी खळाळी सागरी

टापटिपीच्या वस्तूंत
माझी सुखाविते दृष्टि
सात अस्मानाच्या तारा
तुझी ओंजळीशी वृष्टि

अंगणाच्या मातींतली
माझी पायवाट वेडी
गिरीशिखरांची झेप
तुझ्या हसण्याएवढी

हिर्‍या भिंतीच्या ओठांत
माझें शब्दबद्धरूप
तुझ्या वादळविड्याने
कसें रंगवूं मी मुख ?

* * *


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

क्रमांक ............ दि: ..........

# तसु तसु अंधारांत

तसु तसु अंधारांत
तुझी स्वप्नसंथ नीज
गगनाच्या किनाऱ्याला
रेंगाळते अर्धी बीज

तसु तसु अंधारांत
आल्या निःश्वासांच्या छाया
शहारली क्षण क्षण
डोहभर कृष्णकाया

तसु तसु अंधारांत
शब्द झाले स्वप्नचिंब
स्पर्शसागराच्या काठीं
अंग झालें थेंबथेंब

तसु तसु अंधारांत
आली मातीला भोवळ
देठ तुटल्या ताऱ्याचें
तिला आलें उल्काबळ

तसु तसु अंधारांत
रात्र शोधी पायवाट
आडवाटेच्या डोळ्यांत
मन नहातें पहाट

* * *

## केव्हा धारा केव्हा ऊन !

कसें तुला ग कळलें
गूढ निळाईचें गीत
आणि चंद्राच्या ओठींचें
निळें चांदण्याचें स्मित

कशी तुला ग कळली
अंधाराची जवळीक
देई एकटेपणाला
मुक्या हुंदक्यांची भीक

कसें तुला ग कळलें
उन्हांतलें तृणदुःख
तरुतळीं तळ्यांतलें
शोधी भोवरा इप्सित

कसा तुला ग कळला
क्षितिजांचा वेडेपणा
पहाटेच्या स्पर्शासाठी
कण्हतांना भाववेणा !

पापणीच्या डहाळीची
कळी फुलेना अजून
बाहुलीला परी दिसे
केव्हा धारा, केव्हा ऊन !

* * *

## काय घेशील लाजेचें ?

काय घेशील लाजेचें
घट राहील कोरडा
वाटेवर ठेचा खात
भाव कळेल रोकडा

भाव कळेल रोकडा
पापणीला भिजण्याचा
अंधाराच्या जलशांत
रावा गाईल मनाचा

रावा गाईल मनाचा
गीत उनाड स्वप्नांचें
नदी भरली तुडुंब
काय घेशील लाजेचें ?

* * *

## नको

मौनकळीची तूं
फुलराणी

रचूं नको घरकूल
दिठीवर

संशयवेडे शब्द
धावतील

उन्हांत अपुलें
बांधाया घर !

* * *

## अनोळखीच्या वाटेवरती

अनोळखीच्या वाटेवरती
ओळखीच्या
तव खुणा पाहतां

उनाड माझ्या शब्दांना ये
भावफुलांचा
गंध चाखता!

दिठीस वैरीण झाली शांति
मिठीस नभहि
अपुरें वाटे

सार्द्र स्मृतीच्या वेलीवरल्या
स्वप्नफुलांना
रुतले काटे!

* * *

## दोन क्षण........एक स्वप्न

दोन क्षण ...एक चित्र
पापणींत कोरलेलें
दोन क्षण....एक युग
अंतरांत साठलेलें

मुकें मन मुकी भाषा
पिंजऱ्याचें वज्रदार
काळजाचें खुळेंपण
जीवनाला झालें भार

दोन क्षण...एक स्वप्न
उरीं असें जपलेलें
तुझ्या माझ्या गीतासाठी
सूर लागले वेगळे

* * *

# अशीच दे

व्यथा देशील तर अशीच दे

पश्चात्तापाची उगीच नको पिरपिर तिला
पिचलेल्या आशा
कुजलेलें दुःख
शिळ्या चाकोऱ्या
रोगट आसक्ति
भोंगळ वैराग्य
ढवळून टाक सारें जीवन
युगांताची एक कर जखम
आणि स्रवूं दे
जीवनावरल्या अढळ श्रद्धेची
निर्व्याज धार

व्यथा देशील तर अशीच दे

* * *

# अजून आहे

अजून आहे
पिरपिरणारा प्रकाश रेंगत
लांबटलेल्या सरत्या छाया
माळावरती;

अजून आहे
मावळतीला पिवळी दृष्टि
जलांत धुरळा
वाटेवरती ठसे संशयी

अजून कुठेसा
धुराड्यांतुनी निघतो धूर
समई मधली वात कोरडी

अजून आहे
पिंपळपानीं राकट मस्ती
वावटळीची मुसमुसणारी

अजून नभांत
धावत सुटती विरही पंख
हृदयीं घेऊन दिवसभराचा
रेशमी शाप
कडा पांढऱ्या उगवतीच्या
अन् हृदयामधली कळ शांतशी

तोंच कसें ग
अंगणांतल्या तुळशीला त्या
भरलें वारें
अन् फडफडतो उजवा डोळा !

* * *

# वादळ

काय हवंय तें कळत नाही
ओल्या डोळ्यांत जग भिजत नाही
मनाला मुळी करमत नाही.

अप्सरीय रूप उधळीत आहे
क्षितिजावर स्वप्निल संध्या
उभा अस्मानाचा विशाल दर्पण
सागरी स्पर्श माळरानाचा
ओझरतीशी कुठे चांदणी
बिसतंतूंचा गंध प्राशून
उनाडणारा बालिश वारा
बेहोषीचें स्वप्न उधळीत आहे

पण 'मी' यांत कुठे दिसत नाही
ओल्या डोळ्यांत जग भिजत नाही
मनाला मुळी करमत नाही.

मोठ्या पेवांतून ओतल्याप्रमाणे
माणसं कशीं धावत आहेत
कुणी भेटायला, कुणी गाठायला
कुणी एकटं, कुणी दुकटं
कुणी जमावांत, कुणी आवेगांत
बांधीव रस्त्याच्या छातीवरून, कडेकडेने
चित्राकृतींतील रेषांप्रमाणे
दुनियादारी ही वहात आहे

पण 'मी' यांत कुठे दिसत नाही
ओल्या डोळ्यांत जग भिजत नाही
मनाला मुळी करमत नाही.

एक विराट सर्वभक्षक काळी उगीचता
अवकाशांतून दाटत आहे
सरपटणाऱ्या काळोखाची मान
मातीच्या ओठांत शिरत आहे
एका आटपाट नगराची कथा
ख्रिस्ताप्रमाणे शब्दक्रुसावर
लोंबकळतशी दिसत आहे
माझ्या मनाचा 'मी' यांत कुठंतरी
अडकला आहे.

उसळतं पण अंकुरत नाही
ओल्या डोळ्यांत जग भिजत नाही
काय हवंय् तें कळत नाही
मनाला मुळी करमत नाही.

* * *

## मी साधा माणूस आहे !

उगीच कशाला थापा मारू
मी एक माणूस आहे साधा
वासना भावना कल्पना साऱ्या
माणसाप्रमाणेच आहे बांधा
देव दानव मानव यांना
माझ्यांत अधून मधून वाव आहे
रावणाचा भोग आहे
बुद्धाचाहि जोग आहे
अर्जुनाचा योग आहे
जमदग्नीचा राग आहे
ख्रिस्ताप्रमाणं त्याग आहे
तक्षकाचाहि दंश आहे
अखेर माणसाचाच वंश आहे
माणुसकीची जाणीव आहे
वागण्यांत किंचित् नेणीव आहे
विध्वंसाची वासना आहे
विकासाची कल्पना आहे
जगण्याची कांही भावना आहे
कारण मी साधा माणूस आहे !

खूप प्रेम करावंसं वाटतं
खूप सुख अनुभवावंसं वाटतं
खूप दुःख सहावंसं वाटतं
खूप भोग भोगावंसं वाटतं
सागराची चूळ भरावंसं वाटतं
आकाशाचं मूळ बघावंसं वाटतं
निसर्गाचं खूळ शोधावंसं वाटतं
खूपच खूप करावंसं वाटतं

पण परिस्थितीचा लगाम आहे
परिस्थितीलाहि लंघू शकतों
किंतु माझा मीच गुलाम आहे
कारण मी साधा माणूस आहे !

जगणं, मरणं, हसणं, रडणं,
कुढणं, पडणं, देणं, घेणं,
झोपणं, उठणं, भोगणं, सोडणं
सर्व क्रिया सुरळित आहेत
युगानुयुगें काळ मला
अन् मी काळाला दाबीत आहे
कारण मी साधा माणूस आहे !

पण केव्हा केव्हा होतं असं
पिसाटल्याचं भरतं पिसं
आणि माझ्यांत जागे होतात
कवि, शोधक, महात्मे विख्यात
मलाच म्हणतात, " जरा ऐक
पहा कांहीं, कांही शिक,
तोड कांही, मोड कांही, फोड कांही, जोड कांही,
असं केल्यावाचून बाबा,
तुला कांही गत्यंतर नाही ! "
उदात्त, दिव्य, भयानक कांही
ऐकवतात कांही, सांगतात कांही,
दाखवतात कांही,
पण सांगू होतं काय !
' कशांत काय ना फाटक्यांत पाय ! '
नेहमीचंच चालू आहे
कारण मी साधा माणूस आहे !

पुन्हा उरतों मीच एक
मलाच म्हणतो, ' मार रेघ '
पुष्कळ अनुभव घेऊन बसलों
म्हणूनच कांही वाटत नाही
कुणी कांही म्हणत राहो
माझा एक मीच राही
मी एक साधा माणूस आहे
हेंच माझं म्हणणं आहे
माणसाप्रमाणे जगेन म्हणतों
हेंच माझं गाणं आहे
कारण मी साधा माणूस आहे !

* * *

## यमुना फडके

धुकट धुळीने भरली संध्या
ढेकर छेडित गाते गिरणी
गजबजलेल्या रस्त्यावरती
ओढित पाउल चाले तरुणी.

ही तर परिचित ' यमुना फडके '
शाळा सुटली निघे घराला
पिशवी दुमडुन हात छातिशी
नजर न्याहाळी अस्मानाला.

शाळेमधल्या पोरींसंगे
विसरूं पाहे दुःख नको तें
निघून गेल्या पोरी–पाकळ्या
उगिच मनाशी म्हणते पाढे.

वीजदिव्यांची कतार टाकी
रस्त्यावरती प्रकाश धुरकट
शोरुममधलें चित्र पाहतां
यमुना फडके हसते कडवट.

चहा इराणी घेउन पोऱ्या
गात चालला फिल्मी गीत
धक्का बसतां ' का हो बाई! '
म्हणतो, ' असली ठीक न रीत '



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
... वि: ........ ....

वेंधळलेली गोंधळलेली
यमुना फडके ये भानावर
वळणावरती दिसूं लागती
दुकानांत त्या साड्या सुंदर

जातीं पाखरें करीत चिवचिव
नजर–मनाची होई शर्यत
पिशवीमधली सुई बोचते
येइ उसासा छाती उसवित.

वर्गांतिल ती अलका सोमण
छटेल आणि सुंदर लाडिक
कसें विचारी, 'फडक्यांचा हो,
तुम्हा आवडे कुठला नायक?'

हसली होती यमुना नुसती
गणित पुढ्यांतिल पाहुन फक्त
उत्तरांतल्या आकड्यावरती
शून्यें होतीं लोंबत लाख!

पायांना नित व्यसनच होतें
घराकडे तिज ओढायाचें
दिसलें होतें भिंतींनाहि
मेण्यावाचुन घर चिमण्यांचें!

प्रश्नवर्तुळें कां? नि कशाचीं?
डोळ्याभवती होतीं पेंगत
'अनारकलि' च्या पाटीवरती
यमुना फडके होती हासत.

तोच मार्ग अन् तींच पाउलें
ती शाळा अन् तींच माणसें
यमुना फडके टाकित चाले
कधी न जुळणारे ते फासे !

* * *

REFBK-0011256
REFBK-0011256

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ वि:
क्रमांक ........................ नों: दि:

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११२५६